# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक १२.०५.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपुर शहर पोलीसांची अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द धडक मोहीम, ०३ कॅफे सिलबंद.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर – एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत.

नागपुर शहर पोलीसांनी दिनांक ११.०५.२०२६ रोजी अवैधरित्या, विनापरवाना हुक्का पार्लर चालविणाऱ्या ईसमांविरूध्द धडक मोहीम राबविली. त्याअंतर्गत पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, **१)** भांगे कॉम्प्लेक्स, हाऊस नं. २१९, एन.बि. रोड, गोकुळपेठ, अंबाझरी येथील **''सोरो कॅफे''** येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी कॅफे चालक ज्ञानेश्वर गणपती पौनिकर, वय ३४ वर्षे, रा. जागनाथ बुधवारी, तिननल चौक, नागपूर हा त्याचे ०६ साथीदार वेटर यांचे मदतीने शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता १७ पुरूष व ०५ महीला ग्राहकांना पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण १,१६,५८०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफे चालक व वेटर तसेच ग्राहक असे एकुण २९ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम कलम ४, ६, ७, ८, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८, सहकलम ३३/१३१ म.पो.का., सहकलम २७५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**२)** हाऊस नं. २२१, लक्ष्मी अपार्टमेंट, एन. बि. रोड, अंबाझरी येथील **''निंबस लाऊंज''** येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी कॅफे चालक नामे शेख समीर वल्द वकील अहमद, वय ३२ वर्षे, रा. प्लॉट नं. ३३२, शाहा नगर, काटोल रोड, गिट्टीखदान, नागपूर हा त्याचे १४ साथीदार वेटर यांचे मदतीने शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता २३ पुरूष व ०३ महीला ग्राहकांना पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ७१,०५५/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफे चालक व वेटर तसेच ग्राहक असे एकुण ४१ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम कलम ४, ६, ७, ८, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८, सहकलम ३३/१३१ म.पो.का., सहकलम १२६, १२७, २७५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**३)** गोकुळपेठ, अंबाझरी येथील **''हॅश कॅफे''** येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी कॅफे चालक नामे अरसलान फहीम मिर्झा, वय २४ वर्षे, रा. मिर्झा मंझील, महाल, सि.पि. ॲण्ड बेरार कॉलेज जवळ, कोतवाली, नागपूर हा त्याचा ०१ साथीदार वेटर याचे मदतीने शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता ०९ पुरूष व ०४ महीला ग्राहकांना पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ४०,७८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफे चालक व वेटर तसेच ग्राहक असे एकुण १५ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे कलम कलम ४, ६, ७, ८, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८, सहकलम ३३/१३१ म.पो.का., सहकलम १२६, १२७, २७५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**४)** पोलीस ठाणे कपील नगर हद्दीत, नेटफ्लेक्स चिल कॅफे, रंगला पंजाब रेस्टॉरेंट, मानव नगर, कपीलनगर, नागपुर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी कॅफे चालक नामे सोहेल खान फिरोज खान, वय २२ वर्षे, रा. नवि वस्ती, टेका, पाचपावली, नागपूर हा त्याचा ०१ साथीदार वेटर याचे मदतीने शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता १९ ग्राहकांना पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ८२,९९५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफे चालक व वेटर तसेच ग्राहक असे एकुण २१ आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे कलम ४, ६, ७, ८, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८, सहकलम ३३/१३१ म.पो.का., सहकलम २७२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

नागपुर शहर पोलीसांनी पोलीस ठाणे अंबाझरी व कपीलनगर हद्दीत, अवैधरित्या विनापरवाना हुक्का पार्लर चालविणाऱ्या एकुण ०४ हुक्का पार्लर कॅफेवर कारवाई करून, कॅफे संचालक, वेटर तसेच, पुरूष व महीला ग्राहक असे एकुण १०६ आरोपींविरूध्द कारवाई करून, एकुण ३,११,४१०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील **''सोरो कॅफ, निंबस लाऊंज व हॅश कॅफे''** या तिन्ही कॅफेचे चालकांवर मा. पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्र. २) यांचे आदेशान्वये निर्गमीत करण्यात आलेली नोटीस बजावुन सुध्दा त्यांनी कोणताही प्रतीसाद न दिल्याने, पोलीस उपायुक्तांचे आदेशााने दिनांक ११.०५.२०२६ पासुन वरील तिन्ही आस्थापना पुढील ३० दिवसांकरीता सिलबंद करण्यात आलेल्या आहेत.

नागपुर शहर पोलीसांद्वारे यानंतरही अशाच प्रकारची धडक मोहीम राबविण्यात येणार आहे.

**२) वाडी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे ०२.३० वा. ते ०३.०० चे दरम्यान, फिर्यादी विशाल विरेंद्र कोठारी, वय २० वर्षे, रा. फ्लॅट नं. ३०५, ताजेश्री लक्ष्मण अपार्टमेन्ट, क्वेटा कॉलोनी, लकडगंज, नागपूर हे त्यांचे ईतर चार मित्र असे पाचजण त्यांचे मित्राचे इनोवा क्रिस्टा कारने पोलीस ठाणे वाडी हद्दीतील पंजाबी ढाबा, अमरावती रोड, गोंडखैरी येथून जेवण करून घराकडे परत जात असतांना, त्यांचे कारचे टायर फाटल्याने वाहन डिव्हायडरला धडकले. अपघातामध्ये फिर्यादीचे दोन्ही हाताला मार लागल्याने रक्त निघत होते. फिर्यादीचे मित्राने एका डबलसिट जात असलेल्या दुचाकी पल्सर क्र. एम.एच ४९ ए.डब्लू. २२५९ ला थांबवून, त्यावरील वय

अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटाचे दोन अनोळखी बाईकस्वार आरोपी यांना फिर्यादीस उपचाराकरीता हॉस्पीटलला नेण्याची विनंती केली. आरोपी बाईकस्वार यांनी जखमी फिर्यादीला आपले दुचाकीवर ट्रीपलसिट बसवून थोड्या अंतरापर्यंत नेवून वाहन थांबविले, व ''समोरील चौकामध्ये पोलीस उभे आहेत, ट्रीपल सिट बसल्याने गाडीचे चालान करतील.'' असे म्हणून, न्यु म्हाडा कॉलोनी सुराबर्डी रोड, वाडी येथे घेवून गेले. तेथे पेट्रोल संपल्याचे सांगून फोनद्वारे त्यांचे तिसऱ्या साथीदाराला घटनास्थळी बोलावून घेतले. आरोपींचा तिसरा साथीदार आल्यावर, आरोपींनी संगणमताने फिर्यादीस चाकुचा धाक दाखवून जबरदस्तीने फिर्यादीचे खिश्यातून रोख २,५००/—रू. व फिर्यादीचे हातातील तीन सोन्याच्या अंगठ्या वजनी १५ ग्रॅम असा एकुण ७७,५००/— रू. चा मुद्देमाल काढून घेतला. तसेच, गळ्यातून सोन्याची चैन जबरदस्तीने काढत असतांना, फिर्यादीचे मित्र घटनास्थळी आल्याने तिन्ही आरोपी तेथून पळून गेले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्हयाचे तपासात वाडी पोलीसांनी तांत्रीक तपास करून तसेच आरोपींचे मिळालेल्या वर्णनावरून आरोपींना निष्पन्न करून, नागलवाडीकडे जाणारे कच्च्यारोडवर, पिक्स ट्रान्समिशनजवळ सापळा रचुन आरोपी १) इरशाद उर्फ भुरू वकील पठाण, वय २३ वर्षे, रा. झेंडा चौक, जुनी वस्ती, वडधामणा, नागपुर २) वेदांत शास्त्री पेटफुले, वय २३ वर्षे, रा. हनुमान नगर, वडधामणा, वाडी, नागपुर ३) निखील प्रफुल दुबे, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. १८, खान ले—आऊट, तकीया, वडधामणा, वाडी, नागपुर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींना अटक करण्यात आली व आरोपींचे ताब्यातुन रोख २,०५०/—रू., ०३ सोन्याच्या अंगठ्या, व गुन्हा करतांना वापरलेली बजाज पल्सर क्र. एम.एच ४९ ए.व्हि. १२५९ असा एकुण १,२७,०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी , पोलीस उप आयुक्त (परि. क्र. १), मा. श्री. सतिश गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एम.आय.डी.सी. विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. राजेश तटकरे, दुपोनि. रामश्वर दराडे, सपोनि. राहुल सावंत, पोहवा. प्रमोद गिरी, प्रमोद सोनवणे, प्रविण फलके, हेमराज बेराळ, पोअं. सतीश येसनकर व स्वप्नील करंडे यांनी केली.




**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे खापरखेडा :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ११.०५.२०२६ चे २३.५५ वा. चे सुमारास, खापरखेडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, चकणापूर ते वलनीकडे जाणाऱ्या रोडवर एक ईसम पोलीसांना पाहुन पळताना

दिसुन आला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद सलमान अनवर अली सलमानी, वय २४ वर्षे, रा. वार्ड नं.०६, वलनी कॉलोनी, दर्गाह जवळ, ता. सावनेर, जि. नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०४/२०२६, दिनांक १८.०३.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमना :– घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ११.०५.२०२६ चे २०.२५ वा. चे सुमारास, कळमना पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, चिखली चौक, सुलताना दालचा राईस जवळ एक ईसम शस्त्र हातात घेवुन, येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम हातात लोखंडी चाकू घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास ताब्यात घेवुन निशस्त्र केले व त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव भारत राजू हिरवाणी, वय २३ वर्षे, रा. गल्ली नं. ०५, भवानी नगर, गुरूदेव पान ठेल्याजवळ पारडी, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू किंमती अंदाजे ५००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. विशाल भैसारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे सपोनि. गव्हाणे ९५२७९८१७४५ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :–** दिनांक १२.०५.२०२६ चे ०७.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, पोल क्र. १०३८/३० ते ३२ दरम्यान, मानकापुर, नागपूर येथे पुलाजवळ एक अनोळखी ईसम वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे रेल्वे ट्रॅकवर मृत अवस्थेत मिळुन आले. मृतक ईसमाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतकाचे शव पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी प्रशांत अरूण रामटेके, वय ३७ वर्षे, रा. मिलींद नगर, पाचपावली, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. जागिलवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :–** दिनांक १२.०५.२०२६ चे १२.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, भोले पेट्रोलपंप चौक ते वाडी उड्डाणपूलावर जी.एस. कॉलेजसमोरील भिंती लगत रोडवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन–अंगात पोढऱ्या रंगाचे शर्ट व ग्रे रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. दाढी वाढलेली असून डोक्यावर अर्धवट टक्कल पडलेले आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे संपर्क साधावा.

यात्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. ईश्वर बांबल यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे धंतोली :—** सौ. वैशाली चिंताला रविकुमार , वय ५१ वर्षे, रा. ६४८(ड), सदउ—३६ स्मृतीनगर, भिलाई, पो.स्टे. रूपेला मु.पो. भिलाई, छत्तीसगड, जि.दुर्ग ह्या दिनांक ०७.०५.२०२६ चे ०३.३० ते ०४.०० वा. चे दरम्यान पोलीस ठाणे धंतोली हद्दीतील हॉटेल हरदेव येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे—पांढरे लांब, अंगात— ब्राऊन रंगाचा फुलपॅन्ट, पांढऱ्या रंगाचा टॉप व पायात काळी चप्पल घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— खलच्या ओठाखाली मोस आहे.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :—** कु. पिंकी उमेश विश्वकर्मा, वय १६ वर्षे, रा. खाटीकपूरा, भांडेवाडी, श्रीकांत रारोकर चे घरी नागपूर ही दिनांक ११.०३.२०२६ चे १५.१० वा. पासुन पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— फिक्कट खाकी रंगाचा सलवार सूट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे भांडेवाडी :—** कु. मुस्कान गुड्डू उर्फ तेजराम भलावी, वय २० वर्षे, रा. सुंदर नगर, लाल शाळेजवळ, लांडगेचे घरी किरायाने नागपूर ही दिनांक ०४.०५.२०२६ चे १८.०० वा. पासुन पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— टी—शर्ट व लोअर पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— डाव्या हातावर गोंदण आहे.

**४) पोलीस ठाणे जुनी कामठी :—** कु. रूचा सुधीर डोंगरे, वय २१ वर्षे, रा. नागसेन नगर, मोदी पडाव, नवीन पाणी टाकीजवळ, नागपूर ही दिनांक ०८.०५.२०२६ चे १३.०० वा. पासुन पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— लाल हॅरम व परपल टॉप घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— अपंग असून लंगडत चालते


वैशाली


पिंकी


मुस्कान


रूचा

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**